नियमीत दिवाणी दावा नं. १०३/२०१४

**निशाणी ५ खाली आदेश**

**दिनांक ०२/०७/२०१४**

१. वादींनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ३९ नियम १, २ सह कलम १५१ प्रमाणे प्रतिवादी नं. १६ व १७ यांचे विरुध्द मौजे अंबपवाडी, (अंबप), ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथील सि.स.नं. १०८९, १०९०, १०९१, १०९२ व १०९३ या दावा मिळकती आहेत. दावा मिळकती या वादी व प्रतिवादींच्या वडीलोपार्जित मिळकती आहेत. त्यामध्ये वादी व प्रतिवादी यांची ज्याचे त्याचे हिस्सेप्रमाणे समाईक कब्जेवहिवाट आहे. दावा मिळकतीबाबत वाद व प्रतिवादी यांच्यामध्ये वाटप झालेले नाही. त्यामुळे वादींनी सरसनिरसमानाने वाटप होऊन मिळण्याकरिता प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. दावा मिळकतीपैकी सि.स.नं. १०९१ व १०९३ मध्ये प्रतिवादी नं. १६ व १७ हे बांधकाम करत आहेत व तशी त्यांनी वादींना धमकी दिली म्हणून वादींनी प्रतिवादी नं. १६ व १७ विरुध्द तूर्तातूर्त मनाई आदेश मिळणेकरिता प्रस्तुतचा नि. ५ वरील अर्ज दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी नं. १६ व १७ यांनी नि. १७ वर त्यांचा नि. ५ वरील अर्जास जबाब सादर केला असून प्रतिवादींनी वादींचे कथन नाकारलेले आहे. प्रतिवादी नं. १६ व १७ यांना आर्थिक व मानसिक त्रास देण्याच्या हेतूने नि.५ वरील अर्ज दाखल केला आहे. दावा मिळकतींपैकी सि.स.नं. १०९३ या मिळकतीव्यतिरिक्त इतर सर्व मिळकतींमध्ये वादी व प्रतिवाद यांच्या पूर्वहक्कदारांची नांवे मिळकत उता–यास असून सि.स.नं. १०९१ मध्ये या दोन्ही प्रतिवादींची प्रत्यक्ष कब्जेवहिवाट आहे. सि.स.नं. १०९१ मध्ये प्रतिवादी यांचे जुने कौलारु घर होते व जुन्या घराच्या जागी हे प्रतिवादी नवीन घराचे बांधकाम करत आहेत. केवळ सि.स.नं. १०९३ हीच मिळकत समाईक वापराची आहे. सि.स.नं. १०९३ मध्ये दक्षिणेकडील रस्त्यापासून सि.स.नं. १०९३ची हद्द संपेपर्यंत १० फुट रुंदीची जागा रस्त्यासाठी ठेवण्याचे ठरले होते. वादी व प्रतिवादी नं. १ ते ९ यांनी तशी रस्त्याची जागा सोडलेली नाही. इतर प्रतिवादींनी रस्त्याकरिता १० फुट जागा सोडून सि.स.नं. १०९३ मध्ये बांधकाम केले आहे. वादी व प्रतिवादी नं. १ ते १० यांनी ३फुट रुंदीचा रस्ता सोडून इतर ठिकाणी बांधकाम केलेले आहे. सि.स.नं. १०९३ मध्ये वादी व इतर प्रतिवादी यांनी २० वर्षांपूर्वी बांधकाम केलेले आहे. वादी व प्रतिवादी यांचे पूर्वहक्कदार यांचेमध्ये फार

वर्षापूर्वीच दावा मिळकत व शेतमिळकतीचे वाटप झालेले आहे. या सर्व बाबी वादींनी लपवून ठेवल्या आहेत. त्यामुळे वादींचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती प्रतिवादी नं. १६ व १७ यांनी केली आहे.

३. वादींतर्फे वकील श्री. डी.एम. जाधव यांचा व प्रतिवादी नं. १६ व १७ तर्फे वकील श्री. पी.डी. शिंदे यांचा युक्तिवाद ऐकला. वादीचे अभिकथन व युक्तिवाद विचारात घेता पुढील मुद्दे अवलोकनार्थ काढून त्यावर मी माझा निष्कर्ष सकारण नोंदवित आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादींनी सकृत दर्शनी केस त्यांचे बाजूने आहे हे सिध्द केले का ? | नकारार्थी. |
| २. | न्यायतत्वाचे संतुलन वादींचे बाजूने आहे हे वादीने सिध्द केले काय ? | नकारार्थी. |
| ३. | तात्पुरता मनाई हुकूम न दिल्यास वादींचे अपरिमित असे नुकसान होईल का ? | नकारार्थी. |
| ४. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा नं. १ व २ बाबत –**

४. वादींनी दावा मिळकतींचे मालमत्ता पत्रकाच्या प्रती सादर केलेल्या आहेत. त्यामध्ये सि.स.नं. १०९३ ही वादी व प्रतिवादी यांचे पूर्वहक्कदार यांचे एकत्रीत नांवे असल्याचे दिसून येते. सि.स.नं. १०८९, १०९१ व १०९२ या उता–यांमध्ये प्रतिवादींच्या पूर्वहक्कदारांची स्वतंत्रपणे नांव दिसून येतात. सि.स.नं. १०९० वर वादींचे पूर्वहक्कदार गणू कोंडीबा खोंद्रे यांचे मृत्युनंतर वादींचे वडील बाबुराव खोंद्रे, लक्ष्मण खोंद्रे व त्यांचे भाऊ शंकर व मारुती खोंद्रे यांच्या नांवाची नोंद दिसून येते. यावरुन सि.स.नं. १०९३ ही एकच मिळकत समाईक कब्जेवहिवाटीची दिसून येते. इतर सर्व मिळकती या प्रतिवादींच्या ज्याच्या त्याच्या पूर्वहक्कदाराच्या नांवे दिसून येतात.

५. प्रतिवादी नं. १६ व १७ यांनी सि.स.नं. १०९१ ही त्यांचे कब्जेवहिवाटीस असून त्यांच्या जुन्या घराच्या जागी नवीन घराचे बांधकाम सुरु केले आहे असे नमूद केले आहे. सदरची मिळकत ही या प्रतिवादींच्या प्रत्यक्ष कब्जेवहिवाटीत आहे. वादींच्या कथनांनुसार प्रतिवादी नं. १६ व १७ यांनी सि.स.नं. १०९१ व सि.स.नं. १०९३ मध्ये

बांधकाम सुरु केले आहे. परंतु, सदरचे बांधकाम हे सि.स.नं. १०९१च्या हद्दीच्या बाहेर आहे हे दाखविण्यास वादींनी तशी मोजणी करुन अहवाल सादर केलेला दिसत नाही. वादींनी दाखल केलेल्या फोटोंमध्ये प्रतिवादींनी सि.स.नं. १०९१ मध्ये बांधकाम सुरु केल्याचे दिसून येते. त्यालगत सि.स.नं. १०९२ मधील बांधकाम दिसून येते. सि.स.नं. १०९२ मधील बांधकाम पूर्ण झालेले आहे. प्रतिवादी नं. १६ व १७ यांनी सुरु केलेले बांधकाम हे सि.स.नं. १०९२ मधील बांधकामाला समांतर आहे. प्रतिवादी नं. १६ व १७ करत असलेल्या बांधकामाच्या उत्तरेला सि.स.नं. १०९० मध्ये पडलेले घर दिसून येते. सि.स.नं. १०९०च्या मिळकत उता–यावरुन ती मिळकत वादी व त्यांचे इतर सहहिस्सेदार यांच्या मालकीची दिसून येते. वादीने दाखल केलेल्या दावा मिळकतीच्या नकाशामध्ये सि.स.नं. १०८९, १०९०, १०९१ व १०९२च्या पूर्वेला सि.स.नं. १०९३चा भाग आहे. तसेच, सि.स.नं. १०८९च्या उत्तरेला सि.स.नं. १०९३चा काही भाग असल्याचे दिसते. वादींनी नि. ३ सोबत अ.क्र. ८ वर दाखल केलेल्या फोटोंमध्ये प्रतिवादी सध्या बांधकाम करत असलेल्या ठिकाणच्या प्रतिवादींच्या जुन्या घराचे बांधकाम पाडतानाचा फोटो दिसून येतो. त्या फोटोचे अवलोकन करता प्रतिवादी सध्या करत असलेले बांधकाम जुन्या घराच्या जागेच्या हद्दीच्या आतमध्येच करत आहेत असे दिसून येते. त्यामुळे प्रतिवादी नं. १६ व १७ हे बांधकाम करत असले तरी त्यांचे बांधकाम हे त्यांच्या प्रत्यक्ष ताब्यात असलेने जुन्या राहत्या घराच्या ठिकाणीच करत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. सि.स.नं. १०९३ वगळता इतर दावा मिळकती या प्रतिवादींच्या स्वतंत्र मालकी वहिवाटीस असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. सि.स.नं. १०९३ ही समाईक मालकी वहिवाटीची असली तरी त्यामध्ये प्रतिवादी नं. १६ व १७ यांचे बांधकाम असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत नाही. सबब, मनाई आदेश देण्यास वादींना प्रथमदर्शनी केस नाही. तसेच न्यायाचे संतुलन देखील वादींच्या बाजूने नाही असे माझे मत आहे. यास्तव मी मुद्दा नं. १ व २चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ३ बाबत –</u>**

६. प्रतिवादी करत असलेले बांधकाम हे सि.स.नं. १०९३ या त्यांच्या मिळकतीवर असलेले जुन्या घराचे जागेवर बांधकाम करत असलेने तसे बांधकाम केल्याने वादी व प्रतिवादी यांच्या प्रत्यक्ष कब्जेवहिवाटीमध्ये बदल होत नाही. वादींच्या प्रत्यक्ष कब्जेवहिवाटीस असलेल्या मिळकतीस अडथळा होण्याची शक्यता नाही. सबब, मनाई आदेश न दिल्याने वादींचे नुकसान होण्याची शक्यता नाही. उलटपक्षी, मनाई आदेश

दिल्यास प्रतिवादी नं. १६ व १७ यांना घर बांधण्यास प्रतिबंध होईल व त्यांना राहण्यासाठी घर अस्तीत्वात न राहिल्याने त्यांचेच अपरिमीत नुकसान होऊ शकते. यास्तव मी मुद्दा नं. ३चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

७. वरील सर्व कारणांचा व विवेचनांचा विचार करता माझे असे मत आहे की, प्रतिवादीं विरूध्द मनाई आदेश मिळण्यास वादी पात्र नाहीत. सबब,मी पुढील आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वादींचा नि. ५ वरील अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२. नि. १४ वर पारित केलेला दि.०३/०५/२०१४ रोजीचा तात्पुरता मनाई बाबतचा केलेला आदेश आजपासून रद्द करण्यात येत आहे.

३. खर्चाचा परिव्यय हा अंतिम निकालास अधिन राहून असेल.

सही/-

**(मा.ये. वाघ)**

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

पेठ वडगांव

दिनांक - ०२/०७/२०१४